# "प्लास्टिक मुक्त गाव " ह्या विषयावर पथनाट्य

दिनांक २१, २३ व २५ संप्टेंबर २०१९ रोजी **"राष्ट्रीय सेवा योजना आठवडा"** दरम्यान,

**एम . आई . टी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय , आळंदी (दे.)** च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व केंद्र शासनाच्या उन्नत भारत अभियान अंतर्गत "प्लास्टिक मुक्त गाव " ह्या विषयावर, महाविद्यालयातील रा. से. यो. स्वयंसेवक व प्राध्यापकांतर्फे महाविद्यालय परिसरातील मरकळ मध्ये पथनाट्य सादर करून गाव प्लास्टिक मुक्त होण्याकरिता लोकांमध्ये जनजागृती केली व प्लास्टिक वापरबंदी बद्दल लोकांच्या मनामध्ये बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले आणि आपले घर , परिसर व गाव प्लास्टिक मुक्त करण्याची शपथ घेतली. ह्या कार्यक्रमाप्रसंगी गावातील सरपंच, तरुण वर्ग व मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले सदर पथनाट्यांचे विविध ठिकाणी यशस्वी आयोजन महाविद्यालयातील रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीराम नारायणराव कारगावकर ह्यांच्या मार्गदर्शखाली प्रा. संगीता बोर्डे, प्रा. अरविंद वागस्कर, प्रा. संदीप ढवळे व प्रा. वसंत करमाड ह्यांच्या प्रयत्नाने रा. से. यो. स्वयंसेवक व प्रथम वर्ष संगणक विभागातील विद्यार्थी ह्यांनी सादर केले.ह्याप्रसंगी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. बी .बी . वाफारे ह्यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.





